# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०५/०९/२०२४

## प्रेसनोट

मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंधू भवन सपना गार्डन उल्हासनगर-३ येथे दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी दिव्यांग कला सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा.आयुक्त श्री. विकास ढाकणे यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या दिव्यांग कला सांस्कृतिक महोत्सवामध्ये उल्हासनगर शहरातील सर्व दिव्यांग शाळांनी तसेच मनपाच्या शाळांनी सहभाग घेतला होता. यावेळी स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पालक व शिक्षक मोठया संख्येने सहभागी झाले होते.

या स्पर्धांमध्ये पालवी कर्णबधीर विद्यालय, प्रज्ञा करूणा मुकबधीर विद्यालय, साईबाबा मतीमंद विद्यालय, विकास मतीमंद विद्यालय, वेदांत फाउंडेशन विद्यालय आणि मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धांची प्रथम फेरी दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात आली होत्या.

सदर महोत्सवामध्ये ३५० विद्यार्थ्यांनी नृत्य स्पर्धा, गायन स्पर्धा, वेषभूशा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, हस्तकला स्पर्धामध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धांमध्ये प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक पटकवलेल्या स्पर्धकांना मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे व सिने कलाकार श्री. विजय पाटकर तसेच उप-आयुक्त डॉ सुभाष जाधव, श्री. किरण नाकती, दिव्यांग कलाकेंद्र, ठाणे व डॉ. अशोक भोईर व विविध दिव्यांग संघटनेचे पदाधिकारी यांचे हस्ते रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले.

तसेच सदर कार्यक्रमास सहा. आयुक्त श्री. मनिष हिवरे, श्री. अनिल खतुराणी, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम, विधी अधिकारी श्री. राजा बुलानी, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, पर्यावरण विभाग प्रमुख सौ. विशाखा सावंत, क्रिडा अधिकारी श्री. शांताराम चौधरी, सौ. संगिता लहाने समग्र शिक्षा विभाग हे उपस्थित होते.

सदर दिव्यांग कला महोत्सव दरवर्षी साजरा करणार असल्याचे आयुक्त मा. विकास ढाकणे यांनी आपल्या भाषणाचे वेळी जाहीर केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव यांनी केले तसेच कार्यक्रमास उपस्थितांचे दिव्यांग विभाग प्रमुख श्री. राजेश घनघाव यांनी आभार व्यक्त केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with CamScanner